महत्वाचे

आयुक्त, दारूबंदी व उत्पादन शुल्क
महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे कार्यालय

परिपत्रक

क्रमांक-सीएलआर १९८८/३८३९१/प्रधरा मुंबई ९ सप्टेंबर १९८८

देशी मद्य निर्माणीच्या अधिकृत वितरकाकडून महाराष्ट्र देशी मद्य नियमावलीच्या नियमांचे उल्लंघन झालेल्या प्रकरणांबाबत निर्णय घेताना आयुक्तांच्या असे निदर्शनास आले आहे की, एका देशी मद्य निर्माणीचे अधिकृत वितरक असताना त्यांच्या गोदामात दुसऱ्याच निर्माणीच्या देशी मद्याचा साठा ठेवलेला व विकलेला आढळला व याबाबत चौकशीअंती संबंधित जिल्ह्याच्या दारूबंदी व उत्पादन शुल्क अधीक्षकांची पूर्व परवानगी घेतली असल्याचे स्पष्ट करण्यात आले. संबंधित अधीक्षकांनीही महाराष्ट्र देशी मद्य नियमावलीच्या नियम क्र. १८ नुसार एका सीएल २ अनुज्ञप्तीधारकास संबंधित अधीक्षकांच्या पूर्वपरवानगीने दुसऱ्या सीएल २ अनुज्ञप्तीधारकास देशी मद्याची विक्री करता येते, अशी तरतूद आहे. परंतु या तरतुदीचा शब्दशः अर्थ लावून अधीक्षक एका सीएल २ अनुज्ञप्तीधारकास दुसऱ्या सीएल २ अनुज्ञप्तीधारकाला त्याचेकडील देशी मद्य विकण्यास परवानगी देतात. परंतु या तरतुदीतील गर्भितार्थ लक्षात न घेताच अशी परवानगी दिल्याचे निदर्शनास आले आहे.

सीएल २ अनुज्ञप्ती प्रत्यक्षात निर्माणीच्याच नावाने मंजूर केली जाते. मात्र ती चालविण्यास निर्माणीकडून अभिकर्ते (वितरक) नेमलेले असतात. याचा अर्थ या अभिकर्त्यांनी अनुज्ञप्तीत जागेत फक्त ज्या निर्माणीचे ते अभिकर्ते आहेत त्याच निर्माणीचे देशी मद्य ठेवण्यास वा विकण्यास परवानगी आहे आणि म्हणूनच त्यांना दुसऱ्या निर्माणीच्या सीएल २ अनुज्ञप्तीधारकाकडून देशी मद्य विकत घेता येणार नाही, गोदामात ठेवता येणार नाही अथवा विकताही येणार नाही.

तरी सर्व दारूबंदी व उत्पादन शुल्क अधीक्षकांनी यापुढे एका सीएल २ अनुज्ञप्तीधारकास दुसऱ्या सीएल २ अनुज्ञप्तीधारकाकडून देशी मद्य खरेदी करण्यास परवानगी देताना हे दोन्ही अभिकर्ते एकाच निर्माणीचे वितरक असल्याची खात्री करून घ्यावी. एरव्ही अशी परवानगी देऊ नये. अन्यथा सीएल २ अनुज्ञप्तीधारकाकडून आढळलेल्या उल्लंघनास सदरचे अधिकारी जबाबदार राहतील.

सर्व अधिकाऱ्यांनी नोंद घ्यावी.

(मि. ब. चौबे)
आयुक्त, दारूबंदी व उत्पादन शुल्क
महाराष्ट्र राज्य मुंबई